# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## आरोग्य विभाग (मुख्यालय)

## जाहिर सुचना क्र.०३ /२०२५-२६

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका पशु वैद्यकीय विभाग कार्यालयाकडून खाली नमुद केले कामासाठी एजन्सी नियुक्तीकरीता जाहिर निविदा www.smkc.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करून निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजीत रक्कम रु. | फॉर्म फि र.रु. | बयाणा र.रु. |
|---|---|---|---|---|
| १. | महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती क्र. १ चे कार्यक्षेत्रामध्ये "वेस्ट टू बेस्ट" अंतर्गत निश्चित केलेल्या ठिकाण सुशोभिकरण करणे. | रु. ८३,०००/- | रु.२५०/- | रु.८३०/- |
| २. | महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती क्र. २ चे कार्यक्षेत्रामध्ये "वेस्ट टू बेस्ट" अंतर्गत निश्चित केलेल्या ठिकाण सुशोभिकरण करणे. | रु.९९,१७०/- | रु.२५०/- | रु.९९२/- |

१. निविदा फॉर्म मिळण्याचे व सादर करण्याचे ठिकाण आरोग्य विभाग, शाळा नं. १ जवळील इमारत सांगली
२. संपुर्ण निविदा प्रक्रिया म्हणजे अर्ज विक्री, सादरीकरण व स्विकृती आरोग्य विभाग मुख्यालय, सांगली व्दारे कार्यरत राहील.
३. निविदा संचाची विक्री आरोग्य विभाग, शाळा नं. १ जवळील इमारत सांगली येथे दि.१४/०५/२०२५ ते दि. २१/०५ /२०२५ रोजी दुपारी ०३.०० वाजेपर्यंत उपलब्ध केली जातील व दि. २१/०५ /२०२५ रोजी सायं. ०४.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील.
४. निविदा दि.२२/०५ /२०२५ रोजी सायं. ०४.०० वा. निविदा कमिटी समोर उघडण्यात येतील.
५. निविदा प्रक्रियेबाबत अधिक माहितीसाठी महानगरपालिका आरोग्य विभाग, शाळा नं. १ जवळील इमारत सांगली येथे संपर्क साधावा.
६. या निविदा बाबतच्या शर्ती अटी आरोग्य विभाग, शाळा नं. १ जवळील इमारत सांगली येथे उपलब्ध आहेत.
७. कोणतेही एक टेंडर स्विकारणे अथवा कोणतेही कारण न दाखवता सर्व टेंडर नाकारणेचा अधिकार महानगरपालिकेने राखून ठेवला आहे.

(अनिल पाटील)
प्र. मुख्यय स्वच्छता अधिकारी
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

दिनांक :- / /२०२५

# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## घनकचरा व्यवस्थापन विभाग

जाहिर सुचना क्र. ०३ /२०२५-२६

(काम क्र. १ व २ करीता)

**शर्ती व अटी**

निविदा दोन लिफाफा पध्दतीने द्याव्यात.

अ. **लिफाफा क्रं. १ यामध्ये खालील तांत्रिक कागदपत्रे आवश्यक आहेत.**

i) बयाणा चलन

ii) व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र.

iii) GST नोंदणी प्रमाणपत्र.

iv) पॅन कार्ड

v) निविदाकाराला गेल्या ५ वर्षामध्ये शासकीय/निमशासकीय संस्था/ स्थानिक स्वराज्य संस्था/महामंडळाने काळ्या यादीत टाकलेले नाही याबाबतचे निविदाकाराच्या लेटर हेडवरील हमीपत्र.

१. टेंडर फॉर्मवर दर देताना कामगिरीच्या तपशिलानुसार दर सर्वकरासहित देणेचा आहे.

२. मुख्य स्वच्छता अधिकारी यांनी निश्चित केलेल्या ठिकाणी मंजूर मक्तेदार यांनी वेस्ट टू बेस्ट उपक्रमा अंतर्गत आवश्यक साधनसामुग्रीचा वापर करुन सुशोभीकरण करणे बंधनकारक राहील

३. कामगिरी वेळेत करणे बंधनकारक आहे.

४. सदर कामगिरीकरीता ज्यादाची आवश्यकता भासलेस मंजूर मक्तेदार यांनी निविदेमधील दराने मागणीनुसार ३१ मार्च २०२६ पर्यत कामगिरी करणे बंधनकारक राहील.

५. निविदे सोबत १% बयाणा रक्कम युनियन बँक ऑफ इंडीया, सांगली येथे मनपा खाते क्र.४२४२०२०१०५०२७०८ मध्ये भरणेचा असून बँकेचे चलन लिफाफा क्र.१ मध्ये जोडणेचा आहे. किंवा बयाणा रक्कमेचा डी.डी. मा. आयुक्त सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका यांचे नांवे काढून त्याची प्रत टेक्निकल लिफाफा मध्ये जोडणेची आहे व मुळ चलन निविदा उघडतेवेळी समक्षात सादर करणेचे आहे.

६. टेंडर भरताना खाडाखोड केली असल्यास तेथे टेंडर भरणाऱ्याने स्वाक्षरी केली पाहिजे.

७. टेंडर मंजुरी नंतर मंजुर दराने कामगिरीची लेखी ऑर्डर ठेकेदारास देण्यात येईल.

८. ज्यांचे नावे निविदा मंजूर होईल त्यांनी एकूण रकमेच्या ५% सुरक्षा अनामत रोखीने भरून स्वखर्चाने इकडील नमुन्यात लेखी करारपत्र करून देणेचे आहे.

९. वरील प्रमाणे पुर्तता केली नाही तर बयाणा रक्कम जप्त करणेत येईल व महापालिकेस पुन्हा कराव्या लागणाऱ्या खटाटोपीमुळे जो प्रत्यक्ष ज्यादा खर्च होईल त्या नुकसानीच्या खर्चाची जबाबदारी ज्यांचे नावे टेंडर मंजुर होईल त्यांचे जाती इस्टेटीवर राहिल.

१०. ज्या टेंडरदाराचे टेंडर मंजुर झाले आहे त्यास कोणत्याही कारणास्तव टेंडर मागे घेता येणार नाही. अथवा परस्पर इतर व्यक्ती, संस्था, भागीदार यांना हस्तांतरीत करता येणार नाही.

११. कोणतीही एक अथवा सर्व निविदा मंजूर अथवा नामंजुर तसेच निविदा रद्द करण्याचा अधिकार मा. आयुक्तसो यांचे राहिल.

१२. तसेच शर्ती व अटीमध्ये बदल करण्याचा व वाढ करण्याचा व तसेच निविदा दाखल करणेस मुदतवाढ देणेचा अधिकार महापालिकेने राखून ठेवला आहे. टेंडर शर्ती अटीमधील सर्व बाबींची पुर्तता करू शकणाऱ्या आणि निविदामध्ये नमुद कामगिरी करू शकणाऱ्या निविदा धारकांनीच निविदा भरण्याच्या आहेत.

१३. मागणीप्रमाणे वेळेवर कामगिरी न केल्यास प्रतिदिन र.रु. १००/- मात्र इतका दंड आकारण्यात येईल. तसेच मक्तेदाराने कामगिरी न केलेस २ नंबरच्या निविदा धारकास कामाचा आदेश देण्यात येईल, आणि त्यामध्ये जो जादाचा खर्च येणार आहे तो मंजूर निविदाधारकाकडून वसुल करण्यात येईल.

ब. **लिफाफा क्रं. २ यामध्ये फक्त निविदा दराचा लिफाफा.**

वरील शर्ती/अटी आम्हांस मान्य आहेत.

निविदा धारकांची सही/शिक्का

| (अनिल पाटील) | (अभिजीत मेंगडे) | (शिरीष धनवे) | (स्मृती पाटील) | (रविकांत अडसूळ) |
|---|---|---|---|---|
| प्र. मुख्य स्वच्छता अधिकारी | मुख्य लेखाधिकारी | मुख्य लेखापरिक्षक | उपायुक्त | अतिरिक्त आयुक्त-१ |
| सां.मि.कु.मनपा | सां.मि.कु.मनपा. | सां.मि.कु.मनपा. | सां.मि.कु.मनपा | सां.मि.कु.मनपा |